# पोलीस आयुक्त, कार्यालय, ठाणे

महाराष्ट्र पोलीस
ठाणे शहर

कळवा, खाडी पुलाजवळ, ठाणे (प.) ४००६०१
दुरध्वनी क्रमांक – ०२२ – ०५३४४४९९
ई मेल – cp.thane@mahapolice.gov.in

**OW/DCP TRAFFIC THANE/CP-THANE/NOTIFICATION/ 224 /2025.** **DATE :- 01/10/2025**

**वाहतूक नियंत्रण अधिसूचना – सुधारणा**

**विषय :– अधिसुचनेमध्ये सुधारणा होणेबाबत.**
**संदर्भ :– OW/DCP TRAFFIC THANE/CP-THANE/NOTIFICATION/66/2018, 10/09/2018**

**ज्याअर्थी, ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्राच्या** हद्दीत जड अवजड वाहनांमुळे वर्दळीच्या वेळेमध्ये तसेच शहरातील गर्दीमुळे अनेक ठिकाणी मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे सर्व ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्राच्या हद्दीतील मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे शहर,** महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र. एम.व्ही.ए. –११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून यापुर्वीचे अधिसुचना क्र. OW/DCP TRAFFIC THANE/CP-THANE/NOTIFICATION/66/2018, दि. १०/०९/२०१८ मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करीत आहे.

| | |
|---|---|
| **कोपरी वाहतूक उप विभाग प्रवेश बंद –** | १) मुंबई, नवी मुंबई कडुन आनंद नगर चेक नाका मार्गे ठाणे शहरात येणाऱ्या सर्व अवजड (१० चाकी ट्रक व त्यापेक्षा जास्त) वाहनांना कोपरी वाहतूक उप विभागाच्या हद्दीत **आनंद नगर चेक नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **कासारवडवली वाहतूक उप विभाग प्रवेश बंद –** | २) मुबई, विरार वसई कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने येणारे सर्व अवजड (१० चाकी ट्रक व त्यापेक्षा जास्त) वाहनांना कासारवडवली वाहतूक उप विभागाच्या हद्द्दीत **निरा केंद्र, गायमुख घाट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **वागळे वाहतूक उप विभाग प्रवेश बंद –** | ३) मुंबई कडुन एल.बी.एस. रोड मार्गे ठाणे शहरात येणाऱ्या सर्व अवजड (१० चाकी ट्रक व त्यापेक्षा जास्त) वाहनांना वागळे वाहतूक उप विभागाच्या हद्द्दीत **मॉडेला चेक नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **कळवा वाहतूक उप विभाग प्रवेश बंद –** | ४) बेलापूर ठाणे रोडने विटावा जकात नाका मार्गे कळव्याच्या दिशेने येणाऱ्या सर्व अवजड ( १० चाकी ट्रक व त्यापेक्षा जास्त ) वाहनांना कळवा वाहतूक उप विभागाच्या हद्द्दीत **विटावा जकात नाका** येथे **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे. |
| **मुंब्रा वाहतूक उप विभाग प्रवेश बंद –** | ५) महापे नवी मुंबई मार्गे शिळफाटा, (मुंब्रा वाहतूक उपविभाग) येथून ठाणेच्या दिशेने येणाऱ्या सर्व अवजड ( १० चाकी ट्रक व त्यापेक्षा जास्त ) वाहनांना मुंब्रा वाहतूक उप विभागाच्या हद्द्दीत **पुजा पंजाब हॉटेल, शिळफाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.<br>६) तळोजा नवी मुंबई येथून दहिसर मोरी मार्गे कल्याण फाटा (मुंब्रा वाहतूक उपविभाग) येथून कल्याण व ठाणेच्या दिशेने येणाऱ्या सर्व अवजड (१० चाकी ट्रक व त्यापेक्षा जास्त) वाहनांना मुंब्रा वाहतूक उप विभागाच्या हद्द्दीत **दहिसर मोरी** येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे. |
| **नारपोली वाहतूक उप विभाग प्रवेश बंद –** | ७) गुजरात कडून चिचोंटी नाका मार्गे नारपोली वाहतूक विभागाच्या हद्दीत सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना नारपोली वाहतूक उप विभागाच्या हद्द्दीत **७२ गाळा, चिंचोटी वसई रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **भिवंडी वाहतूक उप विभाग प्रवेश बंद –** | ८) वाडा रोडने नदीनाका मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व अवजड (१० चाकी ट्रक व त्यापेक्षा जास्त) वाहनांना भिवंडी वाहतूक उप विभागाच्या हद्द्दीत **पारोळ फाटा (नदीनाका)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.<br>९) वडपा चेकपोस्ट मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व अवजड (१० चाकी ट्रक व त्यापेक्षा जास्त) वाहनांना भिवंडी वाहतूक उप विभागाच्या हद्द्दीत **धामणगांव, जांबोळी पाईपलाईन नाका व चाविंद्रा नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **कोनगाव वाहतूक उप विभाग प्रवेश बंद –** | १०) नाशिक कडुन मुंबई येणाऱ्या सर्व अवजड (१० चाकी ट्रक व त्यापेक्षा जास्त) वाहनांना कोनगाव वाहतूक उप विभागाच्या हद्द्दीत **बासुरी हॅाटेल (सरवलीगांव)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| कल्याण वाहतूक उप विभाग प्रवेश बंद – | **११)** नाशिक **महामार्गाकडून** बदलापूर, नवी मुंबई, पुणे, उरण, न्हावाशेवा येथे जाणेकरीता **बापगाव वरून गांधारी** मार्गे येणाऱ्या सर्व अवजड ( १० चाकी ट्रक व त्यापेक्षा जास्त ) वाहनांना कल्याण वाहतूक उप विभागाच्या हद्दीत **बापगाव, गांधारी चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.<br>**१२)** मुरबाड वरून शहाड ब्रिज मार्गे कल्याण दिशेने येणाऱ्या सर्व अवजड ( १० चाकी ट्रक व त्यापेक्षा जास्त ) वाहनांना कल्याण वाहतूक उप विभागाच्या हद्दीत **म्हारळ जकात नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| विठ्ठलवाडी वाहतूक उप विभाग प्रवेश बंद – | **१३)** नवी मुंबई तळोजा एम.आय.डी.सी. येथुन तळोजा **बायपास** मार्गे उसाटणे – खोणी, नेवाळी नाका मार्गे येणाऱ्या सर्व अवजड ( १० चाकी ट्रक व त्यापेक्षा जास्त ) वाहनांना विठ्ठलवाडी वाहतूक उप विभागाच्या हद्दीत **उसाटणे नाका व नेवाळी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| कोळशेवाडी वाहतूक उप विभाग प्रवेश बंद – | **१४)** नवी मुंबई तळोजा एम.आय.डी.सी. येथुन तळोजा **बायपास** मार्गे उसाटणे – खोणी मार्गे येणाऱ्या सर्व अवजड ( १० चाकी ट्रक व त्यापेक्षा जास्त ) वाहनांना कोळशेवाडी वाहतूक उप विभागाच्या हद्दीत **खोणी नाका, निसर्ग हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| अंबरनाथ वाहतूक उप विभाग प्रवेश बंद – | **१५)** कर्जत कडुन बदलापुर कडे येणाऱ्या सर्व अवजड (१० चाकी ट्रक व त्यापेक्षा जास्त) वाहनांना अंबरनाथ वाहतूक उप विभागाच्या हद्दीत **खरवई नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.<br>**१६)** मुरबाड कडुन बदलापुर व अंबरनाथ कडे येणाऱ्या सर्व अवजड (१० चाकी ट्रक व त्यापेक्षा जास्त) वाहनांना अंबरनाथ वाहतूक उप विभागाच्या हद्दीत **ऐरंजाड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |

मोटार परिवहन कायद्याचे कलम २(१६) अन्वये परिभाषित सर्व प्रकारच्या अवजड माल वाहतूक करणाऱ्या (१० चाकी ट्रक व त्यापेक्षा जास्त) वाहनांना ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या वरील मार्गावरुन तसेच ठाणे पोलीस आयुक्तालयातील सर्व वाहतुक उप विभागाच्या अंतर्गत हद्दीत देखील **सकाळी ०६:०० वा. ते सकाळी ११:०० वा. पावेतो तसेच सायंकाळी १७:०० वा. ते रात्रौ २२:०० वाजेपावेतो** वाहतुकीस 'बंदी' करण्यात येत आहे.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, ऑक्सिजन गॅस वाहने, जिवनावश्यक वस्तु, नाशवंत वस्तु व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

तरी वरील संदर्भान्वये जारी करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना रद्द करण्यात येत असल्याची तसेच अवजड मालवाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या मोटार (१० चाकी ट्रक व त्यापेक्षा जास्त) वाहनांनाचे मार्गक्रमणास बंदी करण्यात आलेल्या वेळे बाबतची अधिसुचनेची राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**( आशुतोष डुंबरे )**
पोलीस आयुक्त, ठाणे शहर

**प्रति,**

संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री, चर्नी रोड, मुंबई

२/– आपणांस विनंती करण्यात येते की, वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना सुधारणा केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेलया वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**प्रत,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे

२/– वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना जारी केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेलया वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**प्रत मा. सविनय सादर**

जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर व रायगड जिल्हा
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), मुंबई
अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस आयुक्त, मुंबई, ठाणे शहर, नवी मुंबई, मिरा–भाईंदर वसई–विरार
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी,**

पोलीस सह आयुक्त, वाहतूक विभाग, मुंबई
अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण व ठाणे
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर व नवी मुंबई
पोलीस अधीक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे, नवी मुंबई, मिरा–भाईंदर वसई–विरार
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१ ठाणे, परिमंडळ–२ भिवंडी, परिमंडळ–३ कल्याण, परिमंडळ–४ उल्हासनगर, परिमंडळ–५ वागळे इस्टेट

प्रत :– आयुक्त ठाणे, भिवंडी निजामपूर शहर, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका
मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषद

प्रत :– मुख्य व्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी. न्हावाशेवा, नवी मुंबई

प्रत :– स्विय सहायक, मा. पालकमंत्री, जिल्हा ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी

प्रत :– समन्वय अधिकारी, ९. ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसुचना निर्गमित करण्यात आले बाबत नोटीस मध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– सर्व संबंधित वाहतूक संघटना